नि.फौ.ख.क्र. २१४/२०२२
**निशाणी क्र. ६४**

**अभियोग पक्षातर्फे सा. क्र. २ यांचा सरतपास शपथेवर.**

**नावः** मधुकर तुकाराम जाधव,
**वयः** ६६ वर्षे, **व्यवसायः** सेवानिवृत्त व शेती,
**पत्ताः** मौजे चिखली, ता. इंदापूर, जि. पुणे.

**सरतपास सहाय्यक सरकारी वकील ॲड श्रीमती एन. पी. कुचेकर यांचे मार्फत सुरु**

माझे चिखली येथे जमिन गट नं. ३ आणि ७ अंदाजे पाच एकर क्षेत्र आहे. दिनांक २६/०८/२०२१ रोजी मी सायंकाळी ५:०० वाजता आमच्या शेतामध्ये पाहणी करणेकरिता गेलो होतो. त्यावेळेस मी भिकाजी दराडे, दादा दराडे, मुक्ताबाई दराडे, मनिषा दराडे, अभिजित दराडे, बंडू दराडे, निता दराडे यांना पोल काढताना पाहिले. त्यामुळे मी त्यांना का पोल उखडता असे विचारले. त्यावेळी ते मला म्हणाले की, आमची शेती, आमचा पोल असून तु आम्हाला विचारणारा कोण असे म्हणून मला शिवीगाळ केली. त्यावेळेस मी त्यांना तुम्ही मला शिवीगाळ करू शकत नाही असे म्हणालो. त्यावर ते मला म्हणाले की, तु काय करू शकतो असे म्हणून मला मारहाण सुरू केली. दादा दराडे यांनी मला खाली पाडले आणि बाकीच्या लोकांनी मला काठीने आणि हाताने, लहान दगडांनी मारहाण केली. त्यानंतर झालेल्या गोंधळाने लांब असलेले माझे भाऊ नामे हनुंमत जाधव आणि आमचे नोकर उमाजी खोमणे हे त्या ठिकाणी आले व मला सोडविले. त्यानंतर आम्ही भवानीनगर येथील पोलीस दुरक्षेत्रात फिर्याद देणेकरिता गेलो. पोलिसांनी मला साधारण ६:००—६:३० वाजता मेडिकल यादी दिली होती. त्याप्रमाणे मी सणसर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेलो असता तो दवाखान बंद असल्याने आम्ही बारामती येथील महिला हॉस्पिटल येथे उपचाराकामी गेलो. त्या दिवशी रात्री माझी तब्येत व्यवस्थित नसल्याने मी दुसऱ्या दिवशी पोलीस ठाणेत गेलो. परंतु पोलीसांनी त्या दिवशी माझी फिर्याद नोंदवून घेतली नाही. त्यांनी मला आमच्यामध्ये तडजोड होते की नाही हे पाहणेस सांगितले. त्यानंतर दोन दिवस त्यामध्ये गेले परंतु आमचेमध्ये तडजोड झाली नाही. म्हणून मी फिर्याद दिली. आता मला माझा फिर्यादी जबाब दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ६५** देण्यात येते. आता मला मी

दिलेला प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क. ६६** देण्यात येते.

**२.** मला दादा दराडे यांच्या मुलाने काठीने मारहाण केलेली होती. मी काठी पाहिल्यास ओळखू शकतो. आता मला वस्तुचिन्ह ‘अ’ दाखविण्यात आले. ते तेच आहे. आता मला पोलीसांनी दिलेली मेडिकल यादी दाखविण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क. ६७** देण्यात येते. उपचारादरम्यान वैदयकीय अधिकारी यांनी माझी तपासणी करून वैदयकीय प्रमाणपत्रावर माझा अंगठा घेतला.

**३.** माझा जबाब नोंदविल्यानंतर मी पोलीसांना घटनास्थळ दाखविले होते. मी आरोपींना ओळखतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहेत.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास आरोपीचे वकील श्री. एस. एस. टिळेकर यांचे मार्फत शपथेवर</u>**

**४.** हे म्हणणे खरे आहे की, भिकाजी दराडे यांची जमिन माझ्या जमिनीच्या पश्चिमेस आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या दोघांच्या जमिनीच्या क्षेत्राच्या मध्ये दक्षिणोत्तर चालीचा बांध आहे.

प्रश्नः दिनांक २९/०५/२०२० रोजी तुम्ही सदर दक्षिणोत्तर चालीचा बांध फोडल्यामुळे तुमचेमध्ये भांडण झालेले होते?

उत्तर: मी बांध फोडलेला नव्हता. आमचेमध्ये शाब्दिक वादावादी झालेली असावी.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर गावातील सरपंच, पोलीस पाटील राजु गायकवाड, शिवाजी तायप्पा अर्जुन, विजय निवृत्ती पांढरे, संजय अर्जुन, मारूती जाधव यांनी मला तसेच माझा भाऊ हनुमंत आम्हाला भांडण करू नका असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी व माझा भाऊ हनुमंत आम्ही दादा दराडे यांना लाथाबुक्याने मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस हनुमंत यांनी ढकलून दिले होते आणि प्रशांत याने शिवीगाळ केलेली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी, माझा भाऊ हनुमंत आणि पुतण्या प्रशांत आम्ही बाळासाहेब दराडे यांना लाथाबुक्यानी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, मनिषा यांना मी, माझा भाऊ हनुमंत आणि पुतण्या प्रशांत यांनी शिवीगाळ व

दमदाटी केली तसेच दादा दराडे यांना जिवे मारणेची धमकी दिली. हे मला माहित नाही की, त्यामुळे माझ्या विरूध्द एन.सी. क्र. ४६३/२०२० दाखल केला आहे किंवा कसे.

**६.** मला जमिन गट नं. ३ माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०४/०७/२०१८ रोजी मी जमिन गट नं. ३ ची मोजणी करणेकरिता भुमी अभिलेख कार्यालय यांचेकडे अर्ज दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे दिनांक १२/१०/२०१८ रोजी मो.र.नं. ४८९०/२०१८ अन्वये मोजणी झालेली होती.

प्रश्नः मोजणी झालेनंतर तुम्ही जमिन गट नं. ३ च्या हद्‌दी खुणा करणेची आवश्यकता नसलेबाबत जबाब दिलेला होता काय?

उत्तरः जमिन गट नं. ३ ची मोजणी झाले नंतर मला मोजणी कार्यालयातील अधिकारी यांनी तुम्हाला लगेचच मोजणीच्या खुणा करून हवे आहेत का की नंतर व्यवस्थित हद्‌दीखुणा करून देऊ त्यावर मी त्यांना हो असे म्हणालो होतो.

**७.** हे म्हणणे खरे आहे की, जमिन गट नं. ३ ची मोजणीची आवश्यकता नसून विनाकारवाई प्रकरण निकाली करणेत यावे असा जबाब असून त्यावर माझी मोजणी कार्यालयातील अधिकारी यांनी सही घेतली होती.

**८.** हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मी जमिन गट नं. ३ च्या मोजणी करिता जुन २०२१ मध्ये अर्ज दिलेला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे मो.र.नं. ५७१४/२०२१ अन्वये मोजणी करणेत आली. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मोजणी करणेकामी मी पोलीस संरक्षणाची मागणी केलेली होती.

प्रश्नः मो.रं.न. ५७१४/२०२१ प्रमाणे झालेल्या मोजणी अन्वये भुकरमापक उपअधिक्षक कार्यालय यांनी हदद्‌खुणा कायम केल्या होत्या?

उत्तरः त्यांनी चुकीच्या हद्‌दीखुणा केलेल्या होत्या तसेच मोजणी प्रमाणे पुर्ण हद्‌दीखुणा केलेल्या नव्हत्या.

**९.** हे म्हणणे खरे आहे की, त्याप्रमाणे भुकरमापक यांनी हद्‌दीखुणेचे खांब रोवले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अर्ध्या क्षेत्राचे खांब रोवलेले होते.

**१०.** हे म्हणणे खरे नाही की, या मोजणीमध्ये मी भिकाजी दराडे यांच्या क्षेत्रामध्ये ६ फुट अतिक्रमण केलेचे दिसून आले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे आम्हाला त्या दिवशी ६ फुट क्षेत्र दराडे यांना काढून दयावे लागले. हे म्हणणे खरे आहे की, हद्दीखुणा कायम करतेवेळेस मी, दराडे आणि पोलीस तसेच आजुबाजूचे दोन—तीन बांधकरी हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, दराडे यांना ६ फुट क्षेत्र काढून दयावे लागल्यामुळे माझ्या मनामध्ये त्यांच्या विषयी राग होता. हे म्हणणे खरे आहे की, मोजणीप्रमाणे भुमी अभिलेख कार्यालयातून ‘क’ पत्रक तयार करण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, भुकरमापक यांनी ‘क’ पत्रकामध्ये जमिन गट नं. ४ मध्ये ६ फुट क्षेत्र अतिक्रमीत असल्याचे दाखविलेले आहे.

**११.** तथाकथित घटनेदिवशी मी शेतामध्ये ५:०० वाजता गेलो होतो आणि साधारण अर्धातास शेतामध्ये होतो. चिखली ते भवानीनगर हे अंतर ८ किमी आहे. मला चिखलीमधून भवानीनगर पोलीस स्टेशनमध्ये जाणेस १५ मिनींटे लागली. मी पोलीस ठाणेत साधारण ५ ते १० मिनींट होतो. मला ५ मिनीटात पोलीसांनी यादी दिली होती. हे मला माहित नाही की, भवानीनगर पोलीस ठाणेच्या परिसरात हॉस्पिटल आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, सणसर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६/०८/२०२१ रोजी सणसर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र चालू होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी गेलो त्यावेळेस बंद होते. सदरचा दवाखाना बंद असलेबाबतचा कागदोपत्री पुरावा मला देता येणार नाही.

**१२.** हे मला माहित नाही की, दिनांक २६/०८/२०२१ रोजी ५:०० वाजता मुक्ताबाई दराडे आणि मनिषा दराडे या त्यांच्या शेतात काम करत होत्या किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मी, हनुमंत दराडे आणि आमचा गडी उमाजी खोमणे आम्ही भुकरमापक यांनी दर्शविले प्रमाणे रोवलेले हद्दीखुणेचे खांब उपटुन काढले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही खांब उपटत असताना मुक्ताबाई दराडे यांनी खांब का उपटत आहे असे विचारले. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी त्यांना असे म्हणालो की, खांब आमच्या जागेत आहे त्यामुळे मी उपटणारच. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावेळेस म्हणालो की, मी खांब उपटणारच

आहे तुम्हाला काय करायचे ते करा. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी मुक्ताबाई या खांबाला पकडून बसलेल्या होत्या त्यांना ढकलून दिले. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या ब्लाउजला धरून त्यांचा ब्लाउज फाडला. हे म्हणणे खरे नाही की, मी ढकलून दिल्यामुळे त्या पडल्या आणि त्यांच्या पायाला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस मी मुक्ताबाई दराडे आणि मनिषा दराडे यांना शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, गोंधळ एककून त्यावेळेस बंडू दराडे, दादा दराडे, भिकाजी दराडे हे त्या ठिकाणी आले आणि त्यांनी मुक्ताबाई आणि मनिषा यांना सोडविले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी दिलेल्या फिर्यादीस शह देणेकरिता मी, माझा भाऊ हनुमंत आणि आमचा गडी उमाजी संगनमत करून सदरची फिर्याद दिली.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, मी माझा भाऊ हनुमंत आणि प्रशांत आम्ही एकविचाराने आहोत. हे म्हणणे खरे आहे की, उमाजी खोमणे हे माझ्याकडे बऱ्याच दिवसांपासून कामास आहे. हे म्हणणे खरे नाही की, उमाजी खोमणे हा माझा विश्वासू नोकर असून माझा शब्द मानणारा आहे. हे मला माहित नाही की, आरोपी हे शेतीबाडी करणारी माणसे असून अल्पभुधारक शेतकरी आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मारूती शंकर जाधव हे माझे शेजारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, जमिन गट नं. ७ च्या लगत जमिन गट नं. ८ असून मारूती शंकर जाधव जमिन गट नं. ८ वहिवाटतात. हे म्हणणे खरे नाही की, जमिन गट नं. ८ मध्ये अतिक्रमण केलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मारूती जाधव यांनी मी केलेले अतिक्रमण काढून मिळणेकरिता तहसिलदार यांचेकडे अर्ज क्र. बांध/एस. आर./१०/२०२१ दाखल केला होता.

प्रश्नः तहसिलदार यांनी सदर अर्जाचा निकालामध्ये असे आदेशीत केले आहे की, झालेले अतिक्रमण काढून देणेत यावे?

उत्तरः सदरचा आदेश हा अर्धा असून दिवाणी न्यायालयाच्या रे.दि.मु.नं. १६९/२०२२ च्या आदेशाच्या अधिन आहे.

**१४.** मी जमिन गट नं. ४ चे धारक शिवाजी शंकर जाधव यांना ओळखतो. मी दुसरे शेजारी सचिन शिवाजी अर्जुन, निलेश दत्तु जाधव यांना ओळखतो. हे

म्हणणे खरे नाही की, माझा सर्व बांधकऱ्यासोबत वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी आर्थिक परिस्थिती चांगली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला दराडे यांची जमिन खरेदी घ्यावयाची असल्याने आणि मला ते जमिन खरेदी देत नसल्याने मी त्यांचेबरोबर नेहमी भांडण काढतो.

**१५.** हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या फिर्यादीमध्ये फिर्याद देणेस उशीर का झाला याचे कारण नमूद केलेले नाही. मी या आरोपींनी मला दगडाने मारहाण केल्याचे पोलीसांना सांगितले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या फिर्यादी जबाबात दगडाने मारहाण केल्याचे उल्लेख नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खांब उपटत असताना स्वत:हुन पडलो. हे म्हणणे खरे नाही की, खांब उपटत असताना हनुमंत आणि उमाजी यांचेकडून खांब लागला. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगणेप्रमाणे घेतला. हे म्हणणे खरे आहे की, दादा दराडे यांनी मला खाली पाडले आणि इतर आरोपींनी मला काठीने मारहाण केली हे माझ्या फिर्यादी जबाबात नमुद नाही. हे मला माहित नाही की, चिखली गावामध्ये अभिजीत उर्फ भैय्या दराडे नावाचा व्यक्ती राहत नाही किंवा कसे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मला ज्या इसमाने मारले त्याचे नाव भैय्या दराडे असे आहे.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, बारामती हॉस्पिटलमध्ये माझ्या ओळखीचे लोक होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मेडिकल यादी ही सणसर प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता दिलेली होती. मी ६:३० ते ६:४५ वाजताच्या दरम्यान डॉक्टरांकडे गेलेलो होतो. मला डॉक्टरांनी हिस्ट्री विचारली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांना अतिक्रमीत क्षेत्र काढून दयावे लागले म्हणून मी त्यांच्याविरोधात खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी खांब उपटलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

माझे समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

JYOTI NITIN BHASME
Digitally signed by JYOTI NITIN BHASME
Date: 2024.12.17 17:51:41 +0530

ठिकाण: इंदापूर
दिनांक : १६/१२/२०२४

(जे. एन. भस्मे)
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर.